आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.:- MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २९५ वा ● शनिवार दि. १३ एप्रिल २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन

मुंबई, : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात गृह तथा सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.



यावेळी बृहन्मुंबईचे विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती, मंत्रालय सुरक्षा विभागाचे पोलीस उपायुक्त प्रशांत परदेशी, कर्मचारी संघटनेचे भारत वानखेडे यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेल आणि जेलमधील नेत्यांना घरी बसवा, मोदी याच्या विकासाच्या स्वप्नाला साथ द्या!

## गोंदियातील प्रचार सभेत भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा यांचे आवाहन

**मुंबई : एकीकडे भ्रष्टाचार समूळ नष्ट करण्यासाठी कटिबद्ध असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दुसरीकडे भ्रष्टाचाऱ्यांना वाचविण्यासाठी एकत्र आलेले इंडिया आघाडीचे नेते यातून योग्य निवड करून देशाच्या विकासाची गंगा नव्या वेगाने वाहती राखण्यासाठी नरेंद्र मोदी यांना तिसऱ्या वेळी पंतप्रधानपदी बसवू या, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी शुक्रवारी गोंदिया येथील जाहीर सभेत बोलताना केले. ज्यांचे अनेक नेते जेलमध्ये, आणि अनेकजण बेलवर आहेत, अशा भ्रष्टाचाऱ्यांच्या आघाडीला कायमचे घरी बसवा, असेही ते म्हणाले. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भंडारा – गोंदिया चे उमेदवार सुनील मेंढे आदी यावेळी उपस्थित होते.**



लोकसभेची ही निवडणूक केवळ एका खासदारास विजयी करण्याची निवडणूक नसून दोन विचारधारांची लढाई आहे. विकासाची राजनीती, देशाच्या उज्ज्वल भविष्याचा संकल्प आणि देशाला जगात प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असलेल्या नरेंद्र मोदी यांना शिव्याशाप देणे, मोदींना सत्तेवरून हटविणे आणि विकासाला विरोध करत भ्रष्टाचाराची पाठराखण करणे एवढाच घमंडी आघाडीचा अजेंडा आहे, असा स्पष्ट आरोप करीत नड्डा यांनी विरोधकांच्या भ्रष्टाचाराचा तपशीलवार पाढाच या सभेत वाचला.

मोदी सरकारने देशाच्या राजकारणाचा चेहरामोहरा बदलून टाकला असून याआधी केवळ उच्चनीच, शहरी–ग्रामीण, आणि जातीधर्माच्या नावाने होणाऱ्या राजकारणास हद्दपार केले. मोदी यांनी राजकारणाची परिभाषाच बदलून टाकली असून आता विकासाचे राजकारण केंद्रस्थानी आले आहे. विकासाच्या मुद्द्यावर व सबका साथ सबका विकास, सबका प्रयास या नीतीने देशाच्या राजनीतीला नवी दिशा मिळाली आहे.

गाव, गरीब, वंचित, पीडित, शोषित, दलित, युवा, किसान, महिला यांची जेथे काळजी घेतली जाते, तेथे विकास, समृद्धी आणि उत्कर्ष साधला जातो. मोदीजींच्या दहा वर्षांच्या सत्ताकाळात गावागावात पक्के रस्ते झाले, वीज पोहोचली. देशातील अडीच कोटी घरे मोदी यांच्या सौभाग्य योजनेमुळे विजेने उजळली, आज देशातील ८० कोटी जनतेला मोफत धान्य मिळते. २५ कोटी लोकसंख्या गरीबीतून मुक्त झाली, ही भारताची समृद्धी आहे. काँग्रेसच्या काळात गरीब महिलांना जळणासाठी लाकडे गोळा करण्याकरिता पायपीट करावी लागायची, चुलीच्या धूरात गुदमरण्याची वेळ यायची, आज दहा कोटी भगिनींना उज्ज्वला योजनेतून गॅस जोडण्या देऊन मोदी यांनी भगिनींची या त्रासातून मुक्तता केली आहे.

२०१४ पूर्वीच्या भारतात, ग्रामीण भागांतील महिलांना सूर्योदयापूर्वी आणि रात्री, नैसर्गिक विधींसाठी घराबाहेर जावे लागायचे. महिलांची प्रतिष्ठा पणाला लावणारे हे लाजीरवाणे प्रकार बंद करण्यासाठी मोदीजींनी घरोघरी स्वच्छतागृहे दिली आणि महिलांच्या प्रतिष्ठेचा सन्मान केला, असे ते म्हणाले. आयुष्मान भारत योजनेतून पाच लाखांचे विमा कवच देऊन मोदी यांनी ५५ कोटी लोकांच्या आयुष्याला सुरक्षितता दिली. महामार्ग, रेल्वे, विमानसेवांचे जाळे या देशाच्या प्रगतीच्या पाऊलखुणा आज सर्वत्र उमटल्या असून मोदी सरकार पुन्हा सत्तेवर आल्यानंतर येत्या पाच वर्षांत देशातील सर्व रेल्वे स्थानके जागतिक दर्जाची होऊन देशाचा संपूर्ण कायापालट झालेला दिसेल, अशी ग्वाही देखील नड्डा यांनी दिली. प्रत्येक जिल्ह्यात मेडिकल कॉलेज हे मोदींचे स्वप्न आहे. विकासाची ही गंगा अशीच निरंतर राहावी, यासाठी मोदी सरकारला पुन्हा सत्ता द्या, कारण मोदी आणि विकास ही अविभाज्य अंगे आहेत. जिथे मोदी तिथे विकास हे समीकरण झाले आहे. एकीकडे भ्रष्टाचार हटाओ म्हणणारे मोदीजी, आणि भ्रष्टाचारियो को बचाओ म्हणत एकत्र आलेले इंडी आघाडीतील पक्ष, यातून भ्रष्टाचार हटविणाऱ्यास निवडायचे, कि भ्रष्टाचाऱ्यांना निवडायचे, याचा निर्णय करण्याची वेळ आली आहे, असे सांगत नड्डा यांनी इंडी आघाडीच्या नेत्यांवरील घोटाळे आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांचा संपूर्ण पाढा वाचला. राहुल गांधी, सोनिया गांधी, पी.चिदम्बरम, लालूप्रसाद यादव, तेजस्वी यादव, तेजप्रताप यादव, तसेच अनेक द्रमुक नेते, तृणमूलचे नेते जामिनावर (बेल) बाहेर आहेत, तर अरविंद केजरीवाल, सत्येंद्र जैन, मनीष सिसोदिया, डीएमके मंत्री जेलमध्ये आहेत. ज्यांचे अर्धे नेते बेलवर आणि अर्धे नेते जेलमध्ये, अशा भ्रष्ट आघाडीला घरी बसवा, असे आवाहन त्यांनी भाषणाच्या अखेरीस केले.

## भाग्यश्री सुडे हिचा खून खटला प्रकरणी फास्टट्रॅक कोर्टात चालवा या मागणीसाठी लातुरात निघाला न्याय मोर्चा

लातूर– आपल्या लातूर जिल्ह्यातील हरंगूळची मुलगी भाग्यश्री सुडे हिचे अपहरण करून काही नराधमानी तिचा निर्घृण खून करून मृतदेह जाळून पुणे – अहमदनगर राज्य मार्गावरील सुपा परिसरात पुरून देहाची विटंबना करण्यात आली. ही अत्यंत संतापजनक आणि हृदयद्रावक माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना फक्त तिच्या कुटुंबासाठीच नव्हे तर महाराष्ट्रासाठी अतिशय धक्कादायक घटना आहे.




या घटनेचा निषेध व्यक्त करून भाग्यश्री सुडे हिचा नराधम मारेकरांना शिक्षा होण्यासाठी शुक्रवार १२ एप्रिल रोजी सकाळी लातूर शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून आयोजित केलेल्या या मोर्च्यात श्री. सुधाकर शृंगारे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, भाजप शहर जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष गणेश गोमसाळे, भाजपा किसान मोर्चाचे प्रदीप पाटील खंडापूरकर ,भाजपचे अजित पाटील कव्हेकर यांच्यासह विविध जाती धर्मातील नागरिक, महिला, महाविद्यालयीन मुले–मुली मोठ्या संख्येने यात सहभागी झाल्या. यावेळी आमच्या लेकीला न्याय मिळालाच पाहिजे, निष्णात सरकारी वकिलांचे नेमणूक करा, खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा असे हजारो फलक घेऊन महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## प्रा.श्र्वेता लोखंडे यांना पीएच.डी.

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातील प्रा.श्र्वेता लोखंडे यांना नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी.पदवी प्रदान केली आहे. त्यांनी प्रा.डॉ.विश्र्वनाथ मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली भौतिकशास्त्र विषयातील ' स्टडीज ऑन कॉपर न्ड निकेल डोपड् झिंक ऑक्साईड नॅनोक्रिस्टलाईन थिन फिल्म्स बाय स्प्रे पायरोलिसिस टेक्निक ' या विषयावर विद्यापीठात शोध प्रबंध दाखल केलेला होता.त्यांचे आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये एकूण १० शोधनिबंध प्रकाशित आहेत. त्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी,प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड,उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.विजेंद्र चौधरी,प्रा.मंगेश आवाळे,डॉ.महादेव पंडगे,डॉ. टी.एच.मुजावार,डॉ.शंकर बिराजदार,प्रा.मेघा आञाम, डॉ.रोहिणी शिंदे,प्रा.वैशाली चांडक,डॉ. लहु काथवटे,प्रा.संध्या जाधव यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले.



## ठसका

सगळेच म्हणतात आता मी इंजिन आहे
बोगी नाही तरी म्हणे मी तर जीन आहे
डब्बे घरसले अन रेल्वे खाली उतरली
तरी म्हणे होणार तर आम्हीच विन आहे
आमच्याकडे सर्व कसे चकाचक आहेत
बघा ना आमच्याकडे तर आता रीन आहे
मर्शीडीज चे इंजिन लावून पळते सत्ता
महायुतीची चाकं म्हणून तर तीन आहे
त्यांच्यात पडते कधीही खिंडार परंतु
आम्ही तर भक्कम असे हो टिन आहे
केंद्रातही, राज्यातही आम्हीच कणखर
बाकी सगळे दिसतात ते तर मलीन आहे

**-विजय वाठोरे, हिमायतनगर नांदेड**
**९९७५५९३३५९**




# विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी ठोस आराखडा करावाआमदार धिरज देशमुख यांची मागणी; लातूरच्या लेकीला जलद गतीने न्याय मिळावा

लातूर : उच्च शिक्षणासाठी पुणे, शिक्षणासाठी पुण्यात राहत जनसमुदायातील प्रत्येकाची एकच







मुलांवर लक्ष असणे, ही पालकांची जबाबदारी

आपण अनेकजण मुलींना सांगत असतो... 'असे वाग'. 'तसे वागू नको'. पण, याच गोष्टी घरातील मुलांना फारशा सांगत नाही. पालक म्हणून नेमकी चूक इथेच होते. मुलांवरही तसेच संस्कार पालक म्हणून आपण करायला हवे. त्यांच्यावर लक्ष ठेवायला हवे. त्यांचे मित्र बनून त्यांच्याशी संवाद साधायला हवा, अशा भावनाही आमदार धिरज देशमुख यांनी यावेळी व्यक्त केल्या.

**मुंबई यासारख्या मोठ्या शहरात जावून ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थिनींना रहावे लागते. अशा विद्यार्थिनींची सुरक्षा हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्र्न आहे. याचा गांभीर्याने व संवेदनशीलतेने विचार करून शासनाने विद्यार्थिनींना योग्य सुरक्षा पुरवावी. त्यासाठी ठोस आराखडा बनवावा, अशी मागणी 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी शुक्रवारी (ता. १२) येथे केली.**

**असलेली भाग्यश्री सूर्यकांत सुडे या लातूरच्या विद्यार्थिनीचा पुण्यात खंडणीसाठी निर्घृण खून करण्यात आला. या प्रकरणी न्याय मिळावा यासाठी लातूर येथे काढण्यात आलेल्या न्याय मोर्चात 'लातूर ग्रामीण'चे आमदार धिरज देशमुख हेही सहभागी झाले होते. यावेळी भाग्यश्री सुडे यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.**

**आमदार धिरज देशमुख म्हणाले, आजच्या या मोर्चात सहभागी झालेल्या जनसमुदायातील प्रत्येकाची एकच प्रमुख मागणी आहे की 'आमच्या लेकीला न्याय हवा'. सरकारने लातूरकरांची, पालकांची ही मागणी ऐकून घेवून त्या दृष्टीने पावले टाकावीत. या प्रकरणाचा योग्य तपास करावा. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे. निष्णात सरकारी वकीलाची नेमणूक करावी. सर्व आरोपींना कठोर शासन करावे. या मागण्या मान्य करून घेवून लातूरच्या लेकीला जलद न्याय मिळवून देण्यासाठी असेच ठामपणे सर्वजण उभे राहू.**

## स्थलांतरित, असंघटित कामगारांना शिधापत्रिका वाटपासाठी विशेष मोहीम

मुंबई, : सर्वोच्च न्यायालयाने एका याचिकेमधील दि. १९ मार्च रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्यातील जास्तीत जास्त स्थलांतरित किंवा असंघटित कामगारांना शिधापत्रिकांचे वितरण करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ही विशेष मोहीम एप्रिल ते मे २०२४ या दोन महिन्यांच्या कालावधीत राबविली जात आहे.

या प्रक्रियेमध्ये प्रचलित नियमानुसार पडताळणी किंवा तपासणी करून स्थलांतरित व असंघटित कामगारांना उचित शिधापत्रिका वितरित करुन शिधापत्रिकेवरील अनुज्ञेय लाभ तत्काळ देण्यात यावेत, अशा सूचना क्षेत्रीय यंत्रणेस देण्यात आलेल्या आहेत.

ही प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राबविण्यात येत असल्याने जास्तीत जास्त स्थलांतरित व असंघटित कामगारांनी या प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभागाने केले आहे.

## महाराष्ट्रासाठी २ लाख १५ हजार ८५० शाईच्या बाटल्यांची तरतूद

मुंबई, : लोकसभा निवडणुकीकरिता मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाई लावण्यासाठी महाराष्ट्रात सुमारे २ लाख १५ हजार ८५० शाईच्या बाटल्या लागणार आहेत. या शाईचे वाटप जिल्हानिहाय करण्यात आले आहे.

राज्यातील ४८ लोकसभा मतदार संघांमध्ये ९८ हजार ११४ मतदान केंद्र आहेत. प्रत्येक मतदार केंद्रासाठी प्रत्येकी २ शाईच्या बाटल्या याप्रमाणे १ लाख ९६ हजार २२८ शाईच्या बाटल्यांची संख्या होते. याशिवाय १ लाख ९६ हजार २२८ शाईच्या बाटल्यांबरोबरच १० टक्के अधिक अशा एकूण २ लाख १५ हजार ८५० शाईच्या बाटल्या त्याचबरोबर मतदानासाठी आवश्यक ते साहित्य येत्या काही दिवसात पोहोच करण्यासाठी निवडणूक यंत्रणेमार्फत प्रयत्न सुरु आहेत.

या वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकांकरिता राज्यातील ४८ मतदारसंघांमध्ये ९ कोटी २४ लाख ९१ हजार ८०६ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. या मतदारांच्या डाव्या तर्जनीवर शाई लावण्याकरिता निवडणूक आयोगामार्फत सुमारे २ लाख १५ हजार ८५० शाईच्या बाटल्याची मागणी नोंदविण्यात आली आहे. या सर्व बाटल्या राज्याला प्राप्त झाल्या असून सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. मतदारांच्या तर्जनीवर लावण्यात येणारी आणि काही दिवस न पुसली जाणारी ही शाई म्हैसूर पेंटस् कंपनीमार्फत बनवली जाते.

मतदानाचा हक्क बजावल्याची खूण म्हणून सर्वसामान्य असो की लोकप्रतिनिधी अथवा सेलिब्रिटींकडून शाई लावलेल्या डाव्या हाताची तर्जनी अभिमानाने दाखविली जाते. लोकशाही मजबूत करणारी ही काळी रेष निवडणुकांचा अविभाज्य घटक बनली आहे.

मतदान केंद्रावर मतदाराची ओळख पटविल्यानंतर त्याला प्रवेश दिला जातो. प्रत्यक्ष मतदानापूर्वीच मतदाराच्या डाव्या तर्जनीवर न पुसली जाणारी शाई लावली जाते. त्यानंतर मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठा घेतला जातो. मतदानापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष (पोलींग ऑफीसर) मतदाराच्या डाव्या तर्जनीवर शाई लावलेली आहे की नाही याची तपासणी करतात. जी व्यक्ती डाव्या तर्जनीची तपासणी करु देत नाही ते मतदानासाठी अपात्र असल्याचे मतदान अधिकारी सांगू शकतात. जर एखाद्या मतदाराला डाव्या हाताची तर्जनी नसेल तर त्या व्यक्तीच्या डाव्या हातावरील कोणत्याही बोटाला शाई लावली जाते.

## चंद्रपूरात निवडणुकीची टक्केवारी वाढविण्यासाठी औद्योगिक आस्थापनांची बैठक

चंद्रपूर, : चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उद्योगांचे जाळे पसरले असल्यामुळे येथे कामगारांची संख्या खूप मोठी आहे. मतदानाच्या दिवशी म्हणजे १९ एप्रिल रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली असून औद्योगिक आस्थापनांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

नियोजन भवन येथे आयोजित बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) श्याम वाखर्डे, शिक्षणाधिकारी (माध्य.) निकिता ठाकरे तसेच औद्योगिक क्षेत्रातील विविध संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

औद्योगिक संस्थांनी त्यांच्या स्तरावर एक स्वीप नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करावी. तसेच १३ – चंद्रपूर लोकसभा क्षेत्रांतर्गत गत निवडणूकीमध्ये ज्या मतदान केंद्रावर ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले होते, अशा मतदान केंद्र परिसरातील मतदारांमध्ये उत्साह निर्माण व्हावा व मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी वेगवेगळ्या थीम ठेवून त्यावर आधारीत मतदान केंद्र करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. यावेळी औद्योगिक संस्थेस मतदान केंद्र निश्र्चित करून देण्यात आले.

मतदानाच्या दिवशी मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी सुट्टी देण्यात येते किंवा कामाच्या ठिकाणी योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये संस्था, खासगी आस्थापना इत्यादी भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नसल्याचे निर्दशनास आले आहे. त्यामुळे अनेक मतदारांना मतदानापासून वंचित रहावे लागते. हे लक्षात घेता, या लोकसभा निवडणुकीत कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे.

ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे.

# झरोका

एक – विलासराव देशमूख सर्वोपचार रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय हे रुग्णालय आहे की मरणाचा कोंडवाडा आहे हेच कळत नाही. डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, असे बिथरल्यागत कसा काय बोलतो आहेस. रुग्णाना वैद्यकीय उपचारातून, जीवदान देणारा वाडा म्हणजेच रुग्णालय असते. तेथील डॉक्टर हे रुग्णासाठी देव असतात, रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा म्हणून वैद्यकीय अधिकारी कार्यरत असतात तू असा कसा बरळतो आहेस.

एक – अहो, एक सुगर रुग्ण मागील एक वर्षापासून लातूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार घेतो आहे. एका पायाचे ऑपरेशन झाले असून दुसऱ्या पायाची ही दोन बोटं काढली असून त्यास काल दवाखान्यात उपचारासाठी नेले असताना त्यांच्या नातेवाईकाने असे हाल असताना दवाखान्यात ॲडमिट करुन घेतले जात नाही, तूम्हीतरी बघा म्हणून विनंती करताच तपासणी कक्ष एक मधील डॉक्टर महाशय चवताळले, तूम्ही कोण, आरोप कसे करता, शब्द माघारी घ्या म्हणून थयथड करु लागले पण ते डॉक्टर महाशय हे सर्वोपचार रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता नव्हेत किंवा एम.डी.एम.एस नव्हेत ते एमबीबीएस किंवा प्रशिक्षणार्थी असावेत असा त्यांचा राग रंग होता पण कत्तलखान्यातील माणसासारखेच अंगावर धावून आल्याने रुग्ण व नातेवाईक शांत झाले पण रुग्णसेवेपेक्षा त्याच्या अहंकार मात्र मालकी थाटाचाच वाटला म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, शासकीय रुग्णालय हे नावालाच असते, सर्वच डॉक्टरचे खाजगी दवाखाने थाटलेले आहेत. प्रशिक्षणार्थीवरच दवाखाना चालाते. बरे झाले ॲडमीट करुन घेवून पाय तोडला नाही धन्यता माना. त्यालाच म्हणतात सरकारी दवाखाना अन् बनला खत्तलखाना.

एक – अहो, पण विलासराव देशमूख यांचेच पूत्र अमित देशमूख हे वैद्यकीय मंत्री होते. सद्या आमदार आहेत त्यांचे लक्ष्य कसे काय नाही. हे ही आश्चर्यच वाटते.

दुसरा – अरे, त्यानी गढी सांभाळत, सांभाळत लोककारण, राजकारण करावे की दवाखान्यात येवू बसावे. हे ही तूला कळत नाही. सद्या तर लोकसभा निवडणूका लागल्यात मग तर काय ? कामच काम.

# काय बोलता राव ?

महाराष्ट्र सद्या बारा पोलीस आयूक्तालये आणी ३४ पोलीस अधिक्षक कार्यालये आहेत. यात ६०० पेक्षा अधिक वरीष्ठ पोलीस अधिकारी कार्यरत आहेत पण अशा अधिकाऱ्याच्या घरी पोलीस कर्मचारी हे तीन हजारावर कर्मचारी घरगडी सारखे कामे करतात. त्यात अधिकृत कर्मचाऱ्यासह नव्याने भरतीपात्र कर्मचारी घरकामात असल्याचा प्रकार चक्क एका सेवानिवृत पोलीस अधिकाऱ्याने जनहित याचिकेद्वारे उघड केला आहे.

**काय बोलता राव,**

अरे, पोलीस दलात भरती झालेले तरुण प्रशिक्षण घेत असताना त्याना वरिष्ठ पोलीस अधिकारी घरगुती कामाला वागवितात, भाजीपाला आणणे, कूत्री सांभाळणे, बाजारहाट करणे, लेकराबाळाचे संगोपण करणे वगैरे कामाला लावून त्यांचा वापर करीत असतात. ते नेहमीचंं असते, सभा, मोर्चा, मंत्री दौरा, निवडणूका अशा वेळी अधिकारी व्यस्त असतात त्याना हक्काची सूट्टी न मिळत नसते त्यावेळी पोलीस कर्मचाऱ्याना डयूटीसह अधिकाऱ्याच्या घरचे काम करावे लागते हा आरोप नसून वास्तव आहे. कारण सहाय्यक पोलीस आयूक्त पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या राजेंद्रकूमार त्रिवेदी यानी मुंबई उच्चन्यायालयात जनहित याचिका दाखल केली म्हणून हा घरगडी, पोलीस कर्मचारी हा विषय ऐरणीवर आला आहे. मग तूम्हीच बोला दाजीबा.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील प्रभाग १४ मधील केजीएन ग्रुप लातूरचे अध्यक्ष पाशाभाई शेख यांच्या निवासस्थानी दिली भेट सर्वांना रमजान ईदच्या दिल्या शुभेच्छा

लातुर प्रतिनिधी : राज्याचे माजी वैद्यकीय



शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. ११ एप्रिल रोजी सकाळी लातूर शहरातील प्रभाग १४ मधील खणी भाग येथील केजीएन ग्रुप लातूरचे अध्यक्ष पाशाभाई शेख यांच्या निवासस्थानी लातूर लोकसभा मतदारसंघाचे कॉंग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे आणि इतर सहका–यांसमवेत भेट देऊन सर्वांना ईद निमित्ताने शुभेच्छा दिल्या.

यावेळी लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे कॉंग्रेसचे निरीक्षक सर्जेराव मोरे, सचिन बंडापले, युनूस मोमीन, गणेश एस.आर.देशमुख, रमेश सूर्यवंशी, केजीएन ग्रुप लातूरचे कार्याध्यक्ष सय्यद अशादुल्ला, बशुभाई शेख, मैनोद्दीन घोरडीवाले, हाकानी शेख, सलीम शेख, अलीम शेख, अहमद शेख, हाजी शेख, खय्युम शहा, सुनील जंगवाड आदीसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, शेख कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

# महायूतीपेक्षा बिनशर्त राज....!

महायूती किंवा महाविकास आघाडीला पाठींबा देणे किंवा सहभागी होवून लोकसभा निवडणूक लढवून पदरात अपयश पाडून घेण्याऐवजी किंवा भाजपाच्या महायूतीत सहभागी होण्यापेक्षा बाहेरुन पाठींबा देवून उद्याच्या विधानसभा निवडणूकीसाठीचे बिनशर्त राज मनीधरुनच शिवसेना सत्ता संघर्षात बंडोबा होवून उध्दव ठाकरे याना शह देण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन केलेल्या मनसेप्रमूख राज ठाकरे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचेसाठीच महायूतीला पाठींबा दिल्याने त्यागी, समर्पित, निस्वार्थी राजकारणी राज ठाकरे यांच्या आश्चर्यचकित निर्णयामूळे राजकीय वर्तूळातील समिक्षकांच्या भूवयां उंचावल्याचेच दिसते आहे.

शिवसेनेचे सरसेनापती हिंदूऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यानी उध्दव ठाकरे याना शिवसेनेची जबाबदारी सोपविली तेंव्हाच राज ठाकरे यानी उध्दव ठाकरे याना शह देण्यासाठी मनसे काढली. प्रारंभी यशही आले परंतू हावरटलेल्या राज ठाकरे यानी मुंबईतील बाहेर राज्यातील लोकाविरोधात बंड पूकारले आणी राज ठाकरेचे राज नौटंकी ठरले असले तरी ही महाराष्ट्र माझा, मी महाराष्ट्राचा असा आव आणून महायूतीसाठी जवळीक साधू लागताच रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष तथा केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यानी राज ठाकरेची हवाच काढून टाकली आणी आता तेच राज ठाकरे बिनशर्त पाठींबा जाहीर करतानाच कार्यकर्त्याना विधानसभा निवडणूकीच्या तयारीला लागा असे आवाहन करतात यावरुनच मोदीजीसाठी मनसेचा बिनशर्त पाठींबा ही राज ठाकरेची भूमिकाच स्वार्थी वाटते

## संपादकीय...

अशीच कुजबूज होताना दिसते आहे.

भाजपातील चार चौघं सोडले तर भाजपातील राजकीय नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वटहूकूमी कारभारावर नाराज असले तरी मंत्रीपद, राजकीय सत्तापदामूळे अनेक भाजपा नेते नाराज असताना ही मनसेचे राज ठाकरे म्हणतात की, २०१४ साली नरेंद्र मोदी पंतप्रधान व्हावेत ही मागणी केली आणी ते प्रधानमंत्री झाले त्यात बहूमताचे काय याचा खूलासा न करता पून्हा २०१९ साली मोदी कार्यावर नाराज झाली. पण आजवरचे काम न्यायीक, विकसनशिल असल्यानेच २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत बिनशर्त पाठींबा देत असल्याची नौटंकी राज ठाकरे करीत असल्याने राजकीय वर्तूळात करमणूकीला भरती असल्याचे चित्र दिसते आहे.

महाराष्ट्र फुले, शाहू, आंबेडकराचा असल्याचा कांगावा करुन हिंदूत्वाचा गजर करायचा आणी दलित, मुस्लिम, बहूजन, बाराबलूतेदाराना वाऱ्यावर सोडून मराठा राजकारण करणाऱ्या हिंदूत्ववादी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणी राज ठाकरे यानीच भाजपाचे आजचे नेते फडणवीस, पाटील वगैरे ताक फुकून पीत आहेत मग मोदीजीचे काम चांगले म्हणून मोदीना पाठींबा देणाऱ्या राज ठाकरे याना महाराष्ट्र मुंबई विकायला निघालेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणी त्यांचे कार्य दिसत नाही काय मग विधानसभा निवडणूकीत महाराष्ट्रासाठी की मोदीसाठी मते मागणार याचे ही बनशर्त स्पष्टीकरण करावे अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

लोकसभा निवडणूक ही लोकशाही, संविधानासाठी भारतीय नागरीक आणी त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आहे तेच महत्वाचे निवडणूक अंग, धोरण आहे, टाळी, थाळी वाजवून मेणबत्ती लावून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना जागवायचे नाही तर त्याना सन्मानाने घर संसारात, घराणेशाहीत पाठविणे हे अगत्याचे असताना कोणीतरी प्रबोधनकार ठाकरे यांचा वंशज म्हणून किंवा बाळ ठाकरे यांचा शिष्य, वारस म्हणून माणसाना जनावरे बनवून जनावराना देव देवी ठरवून राम राज्य आणू पाहाणाऱ्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची बाजू घेणाऱ्या राज ठाकरे यानी मनसेला उद्याच्या विधानसभा निवडणूकीत मतदाराकडे मतदान मागण्यासाठी कोणत्या तोंडाने समोर येणार आहेत त्या संबंधीही बिनशर्त खूलासा करावा अशी सर्वसामान्य जनतेतून प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे.

लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने महायूतीत सहभागी न होता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी साठीच बिनशर्त पाठींबा देत असल्याचे मनसेप्रमूख राज ठाकरे यानी जाहीर करतानाच उद्याच्या विधानसभा निवडणूकीच्या कामाला लागा असे कार्यकर्त्यांना आदेश देण्या मागील काय गौडबंगाल आहे याचाही उलगडा जनतेला अपेक्षीत असेल यात संदेह नाही.

# लढला नाही तरी चालेल,पण विकल्या जाऊ नकोस

**लोकसभा निवडणुकीचे वारे कोणा कोणाला अस्वस्थ करीत आहेत, तर काहीना पोटभर पंच पक्वान्ने खायला असून ही खायाला मन होत नाही. त्यामुळेच शांत झोप लागत नाही, काहीना किती ही धन खर्च हो विजय आपलाच झाला पाहिजे असे वाटत असल्यामुळे तो सर्वच खरेदी करण्याच्या तयारीने काम करीत आहेत. तर काही देशातील बेरोजगारी, महागाई, भ्रष्ट्राचार,शिक्षण,आरोग्य यामुळे गेल्या नऊ वर्षात नागरिकांचे झालेले बेहाल यावर आकडेवारी देऊन पोटतिडकीने बोलत आहेत. त्यामुळेच त्यांना अत्यंत महत्वाचे..करो या मरो. असे लोकसभा निवडणुकीत झाले पाहिजे असे वाटत आहे. आणि माझ्या सारख्याला प्रत्येक जातीची मतदार संघातील लोकसंख्या डोळ्या समोर उभी राहत आहे. कोणत्या जातीचे लोक मतदार म्हणून प्रामाणिकपणे मत दान करतील तर कोणता उमेदवार खासदार म्हणून निवडून येऊ शकतो याची उपब्धतेनुसार आकडेवारी मांडतांना दिसत आहे.सरासरी पाच लाख मत मिळाल्यांनतर एक खासदार निवडून येतो.**

तिन टक्के असलेला समाज पंधरा टक्केवाल्यांना पुढे करून पांच्याशी टक्केवाल्यांना कायम गुलाम लाचार बनवत असतो. त्यात गर्वसे कहो हम हिंदू है म्हणणारे बावन्न टक्केवाले तीन हजार सहाशे जातीत विभागलेले मागासवर्गीय ओ बी सी बहुजन समाजाच्या टक्केवारी नुसार एकत्र येऊन शक्ती दाखवत नाही. त्यासाठी विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सांगीतले होते,लढला नाही तरी चालेल पण विकल्या जाऊ नको.

मतदासंघातील बहुजन समाजातील बावन्न टक्के ओबीसी बाजूला ठेवला तरी प्रत्येक मतदारसंघांमध्ये खालील प्रमाणे बौद्धांची संख्या आहे.१) मुंबई दीड करोडपैकी ४० लाख,२) नागपूर ३५ लाखापैकी १२ लाख,३) अमरावती २० लाखापैकी ८ लाख, ४) वर्धा पंधरा लाखापैकी ६ लाख,५) अकोला २० लाखापैकी ८ लाख, ६) सोलापूर १९ लाखापैकी ८ लाख, ७) औरंगाबाद वीस लाखापैकी ७ लाख, ८) नाशिक ३५ लाखापैकी ९ लाख, ९) सातारा २२ लाखांपैकीी ८ लाख,१०) अहमदनगर २२ लाखांपैकी ७ लाख,११) वाशिम १५ लाखापैकी ७ लाख,१२) बुलढाणा १५ लाखापैकी ७ लाख,१३) कल्याण डोंबिवली २० लाखापैकी ७ लाख. म्हणजेच ४८ पैकी १३ मतदारसंघ आंबेडकरी विचारांच्या बौद्धांचे खासदार कोणाचे सहकार्य न घेता निवडून येऊ शकतो त्यासाठी एकजूट दाखवून लढले पाहिजे. पण होऊ शकत नाही हीच मानसीकता बनलेली असेल तर असे लोक खुप अडचणी व समस्या निर्माण करण्यासाठी विकलेले असतात. तीच त्यांची गुणवंत कला कौशल्य असते, तो मग आपल्याच समाजात समाजा बद्दल,नेत्या बद्दल,कार्यकर्त्या बद्दल वैचारिक गैरसमज मतभेद निर्माण करण्यासाठी यशस्वी होत असतो. प्रथम असा लोकांना आपण ओळखले पाहिजे.

लोकसभा निवडणुकी नंतर विधानसभा निवडणूक येणार आहे.बौद्ध मतदारांना खरेदी करण्यासाठी सर्वच पक्षाचे उमेदवार सरसावले आहे. पण बौद्ध मतदाराना माझे आव्हान आहे कि तुम्ही तुमच्यावर झालेला अन्याय विसरु नका.भिमाकोरेगाव दंगल झाल्यानंतर प्रत्येक गावात झालेल्या दंगली विसरु नका.भाऊ,दादा,नाना,आबा,बाबा, ताईसाहेब,वहिनीसाहेब असे अनेक नेते आता बौद्ध मतदाराना भुरळ घालण्यासाठी बाबासाहेबांचे नांव दिवसरात्र घेत आहेत.त्यात १३३ वी भिम जयंती असल्यामुळे सर्वांचे प्रेम उतू चालले असेल.पण हिच वेळ आहे यांना त्यांची योग्य जागा दाखविण्याची. आणि जो आपल्या वेळेला धावुन येईल तोच,आपला नेता समजावा.असा नेता आंबेडकरी चळवळीतील समाजासाठी झटणारा कार्यकर्ता नेता म्हणजेच उमेदवार निवडून द्या. आणि आपले ताकत आपले मत वाया जाऊ देऊ नका,पक्ष फक्त आंबेडकरी विचार जपणारा असावे नेता आणि पक्ष बहुजन हिताची आणि एस सी,एस टी,ओबीसी जनतेला साथ देण्याची असावी.दारु,मटण,पैसा याला बळी न पडता.वंचित बहुजन आणि बौद्धांनी एकत्र राहून एक मताने मतदान करणे आवश्यक आहे.आता चुक केली तर येणारी पिढी हि गुलाम म्हणूनच जन्माला आल्या शिवाय राहणार नाही. म्हणूनच बहुजनानी आता एकच नारा दिला पाहिजे. बहुजन हिताय!बहुजन सुखाय!

बहुजन समाजातील मतदार बंधुनो,आपली स्वतःची ताकद ओळखा.तुम्ही कोणत्याही आंबेडकरी संघटनेशी एकनिष्ठ असा.परंतु यावेळेस मात्र तुमचे अमूल्य मत वंचित बहुजन आघाडीलाच द्यावे असे मी आवाहन करतो.कारण आत्तापर्यंत आपण दुसऱ्यांना मतदान केलेले आहे.त्याचा किती उपयोग झाला ते आपल्या सर्वांना माहीत आहे. उलट नुकसानच झाले आहे.आता मात्र तुमचे मत वाया घालवू नका.सर्वांनी सर्व हेवे – देवे विसरून मतदान केले तर १० तरी खासदार निवडून येऊ शकतात.आणी आमदारकीला ५० पेक्षा अधिक आमदार येऊ शकतात.म्हणजे मुख्यमंत्री सुद्धा आपलाच होऊ शकतो. होऊ शकते ही इच्छाशक्ती आणि मानसिकता तयार करून ठेवा.

मान्यवर कांशीराम यांनी हे उत्तर भारतात चार वेळा करून दाखवले.

त्यासाठी त्यांनी केलेले कार्य प्रबोधन कष्ट,त्याग पडीक जमिनीवर केलेली मशागत म्हणजे स्वाभिमान गमावलेल्या बहुजन समाजात न बिकने वाला समाज तयार केला तेव्हा चार वेळ सरकार बनले.एड प्रकाश यशवंतराव आंबेडकर यांनी ही स्वबळावर अनेक प्रयोग करून दाखवले म्हणूनच आज राज्यात त्यांची राजकीय शक्ती म्हणूनच दखल घेतली जाते. त्यांची शक्ति आपण सर्व आहोत.बाकी बाबासाहेबांच्या नावाचा जय जय कार करणारे रोजनदारी,सलगडी म्हणून निळा झेंडा खांद्यावर घेऊन स्वताच्या पोटासाठी आणि अस्तित्वासाठी काम करतांना दिसतात.त्यांना समाजाचे आंबेडकरी विचारांचे आणि संविधानाचे काही घेणे देणे नाही.काही बुद्धिजीवी विचारवंत घरात बसून आपली विद्वता पणाला लावून वैचारिक मतभेद निर्माण करण्यासाठी डोळ्यात तेल घालून लिहत आहेत. म्हणूनच त्यांना ही सांगणे आहे.लढला नाही तरी चालेल,पण विकल्या जाऊ नकोस.

विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,मान्यवर कांशीराम यांनी सांगितले होते.आणि आता बाळासाहेब एड प्रकाश आंबेडकर सांगत आहेत.हे निवडणूक स्वताच्या अस्तित्वाची असणार आहे. ही ताकद लोकसभेत दिसली तर पुढे तुमच्या आंदोलनाला तलवारीची लेखणीची धार असणार आहे.अन्यता मतदार संघातील मतदारांची संख्या ही गुलाम लाचार लोकांची नव्हे मुक्या जनावरांची गणल्या जाईल.हे प्रत्येक आंबेडकरी विचारांच्या मतदारांनी लक्षात ठेवावे.म्हणूनच कोणाचे नुकसान होईल कोणाचा फायदा होईल यांचे गणित करत बसू नका.

आदेशाची निर्णयाची अंमलबजावणी करा.विजय आपलाच संख्येच्या बळावर गणिताच्या सूत्रानी होऊ शकतो.एकमेकावर आणि महापुरुषांच्या विचारावर विश्र्वास ठेवा.नसेल तर घरात बस.उपाशी मरा.पण दररोज श्रम विकून पोट भरता तसेच मत विकून पोट भरू नका,त्याची शिक्षा पाच वर्ष नव्हे पिढ्यान पिढ्याला भोगावी लागते हे लक्षात ठेवा.म्हणूनच वंचित बहुजना,बौद्ध म्हणून घेणाऱ्या मतदारा.लढला नाही तरी चालेल,पण विकल्या जाऊ नकोस.इतिहास लढणाऱ्यांचा लिहल जातो. लाचारी करणाऱ्या भटांचा भाटांचा नाही.

**सागर रामभाऊ तायडे,९९२०४०३८५९,**
**भांडुप,मुंबई.**

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते दि अमाला रेस्टॉरंट अँड ब्याकवेट्स शुभारंभ

लातुर प्रतिनिधी : राज्याचे माजी वैद्येकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते विधिवत पूजन व दीप प्रज्वलन करून शुक्रवार दि. १२ एप्रिल रोजी



सायंकाळी लातुर शहरातील औसा रिंग रोड वरील सोना नगर या ठिकाणी दि अमाला रेस्टॉरंट अँड ब्याकवेट्सचा शुभारंभ करण्यात आला.

प्रो .प्रा. धनंजय कोंबडे आणि किरण उटगे यांनी सुरु केलेल्या या दि अमाला रेस्टॉरंट अँड ब्याकवेट्सच्या माध्यमातून लातूरच्या खवय्यांना स्वादिष्ट व रुचकर, शुद्ध शाकाहारी पदार्थ ते सुध्दा माफक दरात उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. यावेळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी रेस्टॉरंट डायनिंग हॉल,फंक्शन हॉल,कॉन्फरन्स पाहणी करून आसन व्यवस्था, ईटेरियरचे कौतुक केले.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातुरच्या होतकरु आणि तरुण सहकाऱ्यांनी नाविन्यपूर्ण कल्पना लातूरमध्ये साकारत या रेस्टॉरंटची उभारणी केली आहे हे कौतुकास्पद आहे. लातूरच्या आजच्या या पिढीतील युवकांनी एकत्रित येऊन रेस्टॉरंट व्यवसायातील आंतरराष्ट्रीय दर्जाची बोहोमियन, फ्रेंच थीम या ठिकाणी साकारली असून यामुळे एक वेगळेपणा यात जाणवतो आहे. जे जे नवं ते ते लातूरला हवं हे आपण आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख यांच्या पासून ऐकत मार्गक्रमण करत आलेले आहोत आणि यासाठी आपल्या प्रत्येकाचा हातभार आजवर मिळत आला आहे

यापुढे देखील मिळत राहील यात शंका नाही असे सांगीतले. यावेळी पूढे बोलतांना ते म्हणाले, आपला लोकप्रतिनिधी म्हणून उत्तम वातावरण आपणास मिळणे ही आमची जबाबदारी असून आपल्याला आपला व्यवसाय करताना पोषक वातावरण कसे मिळेल, याकडे निश्र्चित लक्ष दिले जाईल. आपण ग्राहकांना माफ़क दरात उत्तम ग्राहक सेवा पुरवावी, अशी अपेक्षा व्यक्त करीत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दि अमाला रेस्टॉरंट अँड ब्याकवेट्स चे प्रो.प्रा.धनंजय कोंबडे व किरण उटगे आणि त्यांच्या सर्व टीमला रेस्टॉरंट व्यवसाय वृद्धी साठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रस्ताविक करताना वैभव उटगे यांनी दि अमाला रेस्टॉरंट अँड ब्याकवेट्स संदर्भात उपस्थिताना माहिती देत आलेले अनुभव कथन केले आणि उपस्थित सर्वांचे आभार मानले. यावेळी लातुर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष किरण जाधव, गणेश एस.आर.देशमुख, डॉ.प्रशांत उटगे, ड. दीपक सुळ, राम कोंबडे, समद पटेल, बालाजी कोंबडे, विजय देशमुख, श्रीनिवास येलगट्टे, सचिन दाताळ, डॉ विश्रांत भारती, डॉ. रमेश भराटे, वेदांत कोंबडे, वैभव उटगे, दत्तू कोंबडे यांच्यासह कोंबडे व उटगे मित्र परिवाराची उपस्थिती होती.

## बुध्दीमत्तेचा व ज्ञाणाचा जगाच्या पाठीवरील महान योध्दा भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला पाहिजेत.स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतीज्ञ,तत्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील अशा महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महु इथे झाला व संपूर्ण भारतवर्षे सुर्यासारखे लखलखायला लागले. जनुकाय बाबासाहेबांच्या रूपात या पृथ्वीतलावर दैवी शक्तीच प्रगट होवून ज्ञान जोत प्रगटली की काय असे सर्वांनाच वाटत होते. बाबासाहेबांनी समाजाच्या हितासाठी आणि देशहीतासाठी आपले प्राणपनाला लावले. त्यामुळेच त्याच्या अथक प्रयत्नाने संविधानाच्या चौकटीत संपूर्ण भारताला बांधून ठेवले व लोकशाही निर्माण केली.आज प्रत्येकाला संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळत असतो.आजही अनेक देशांमध्ये हुकूमशाही दीसुन येते.परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच भारतीय लोकशाही टीकुन आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील लोकांना न्याय मिळावा यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. तेव्हाच भारतात न्यायव्यवस्था प्रस्थापीत झाली.कारण बाबासाहेबांना कल्पणा होती की काही मुठभर समाज देशातील सर्वसामान्यांना कलंकीत करण्याचे काम करीत आहे.परंतु बाबासाहेबांचे या संपूर्ण हालचालींवर लक्ष होते. याकरीता समाजात जातीयवाद, धर्मवाद,पंथवाद यात कटुता निर्माण होवू नये याकरिता सर्वांना एकत्र आणन्याचे काम त्यांनी केले.आज जगामध्ये अनेक देशात बाबासाहेबांच्या विचारांची जोपासना केली जाते.कारण बाबासाहेबांच्या विचारांमध्ये ज्ञाणाचा व बुध्दीमत्तेचा अथांग महासागर आहे.त्याची आपण कल्पना सुध्दा करु शकत नाही. त्याची तुलना समुद्रापेक्षाही अफाट आहे.



कारण त्यांच्या बुद्धीमत्तेचा व कौशल्याचा संपूर्ण जगात आजही गुणगान होतांना आपण पहातो.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानयोगी असल्यामुळे त्यांची कला जगात कोणीही अवगत करू शकले नाही.आज भारतात संपूर्ण समाज आनंदाने रहातो व बागडतो ते फक्त बाबासाहेबांच्या विचारांमुळे व संविधानामुळेच. बाबासाहेबाचा जन्म गरीब घराण्यात झाला असला तरी ते मनाने व विचाराने खूप श्रीमंत होते.आज प्रत्येकाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांने प्रेरीत होऊन देश घडवीण्याकरीता पुढाकार घेण्याची गरज आहे.कारण बाबासाहेबांच्या विचाराने भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला मोठी प्रेरणा दिली आहे. त्यामुळे आज जगातील प्रत्येक देशात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर केल्या जातो.परंतु आजचा राजकीय पुढारी बाबासाहेबांचे विचार विसरुन समाजाच्या प्रगतीकडे लक्ष न देता स्वतःची प्रगती करतांना दिसत आहे.याचे दु:ख बाबासाहेबांना अवश्य होत असावे. बाबासाहेब आंबेडकर,ज्योतीबा फुले इत्यादी अनेक थोर महापुरुषांनी देश सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी अथक प्रयत्न केले व १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.

परंतु गेल्या काही वर्षांत मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी भ्रष्टाचार करून वाममार्गाने मोठ्या प्रमाणात करोडोंची चल–अचल संपत्ती कमवुन देशाच्या १४० कोटी जनतेच्या खांद्यावर महागाई, बेरोजगारी, महागडे शिक्षणाचे ओझे लादले आहे.याचे दु:ख बाबासाहेबांना अवश्य होत असेल.स्वत:ला लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी व स्वयंघोषित समाजसेवक समजणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनो आपण वाममार्गाने कमविलेली करोडोंची चल–अचल संपत्ती सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावी.असे जर कार्य राजकीय पुढारी करीत असेल बाबासाहेबांना राजकीय पुढाऱ्यांची खरी आदरांजली होईल.कारण बाबासाहेबांनी समाज हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले याला कुठेही तडा जाणार नाही याची जाण आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी ठेवायला पाहिजे.बाबासाहेब आंबेडकर आपले सर्वांचेच दैवत आहे. त्यामुळे जयंतीच्या निमित्ताने देशातील प्रत्येक व्यक्तीने, प्रशासनाने व सरकारने वृक्षारोपणाचा संकल्प केला पाहिजे. कारण दिवसेंदिवस निसर्गाचा ह्यास होत आहे.त्यामुळे निसर्गाला वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.त्यामुळे १४ एप्रिलला वृक्षारोपण व्हायला हवे यामुळे एकाच दिवशी देशात लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल आणि संपूर्ण निसर्ग प्रफुल्लित होईल व प्रत्येक झाडात, पानात व फुलात आपल्याला बाबासाहेबांचे दर्शन अवश्य होईल.भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# चहासोबत गोड बिस्किटे खात असाल तर सावधान! भोगावे लागतील असे परिणाम

अनेक जण आपल्या दिवसाची सुरुवात चहाने करतात. काहींना सकाळी चहा मिळाला नाही तर त्यांची डोकेदुखी सुरू होते. काही लोकांना चहाबरोबर काहीतरी खाणे आवडते. आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेक लोक सतत चहा पित असतात. पण सतत चहा पिणे आरोग्यास फार धोकादायक असतं. ६-७ तासाच्या झोपेनंतर सकाळी उठल्या उठल्या पहिला चहा पिणं आरोग्याला अपायकारक आहे. यामुळे पचनसंस्थेचे आरोग्य बिघडते. अचानक अस्वस्थ्य वाटणं, उलटी होणं हा त्रास जाणवतो. आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की, चहासोबत खालेल्ल?या कोणत्या गोष्टी तुमच्यासाठी हानिकारक ठरू शकतात.



अनेकांना चहासोबत अंडी खायला आवडतात. या दोन्हींचे एकत्र सेवन करणे तुमच्या आरोग्यासाठी खूप हानिकारक आहे. कारण जेव्हा चहाच्या पानात असलेले टॅनिक ॲसिड अंड्यातील प्रथिनांमध्ये मिसळते तेव्हा ॲसिड प्रोटीन कपाउंड तयार करतात. ज्यामुळे बद्धकोष्ठता आणि मूळव्याध होण्याचा धोका वाढतो.

गोड बिस्किटे

बहुतेकांना चहासोबत गोड बिस्किटे खायला आवडतात. चहासोबत गोड बिस्किटे खाल्ल्याने साखरेचा धोका वाढतो. जर शरीरात साखरेचे प्रमाण जास्त असेल तर त्यामुळे चेहऱ्यावर मुरुमे येऊ शकतात, याशिवाय चेहऱ्यावर सुरकुत्याही येऊ शकतात.

बेसनापासून बनवलेल्या वस्तू

पावसाळ्यात चहासोबत भजी खाणं खूप आवडतं. पण तज्ज्ञांच्या मते बेसनापासून बनवलेल्या गोष्टी चहासोबत घेतल्यास त्याचा शरीरावर चुकीचा परिणाम होतो. या दोन गोष्टींचे एकत्र सेवन केल्याने शरीरात आवश्यक पोषक तत्वांची कमतरता होते आणि पोटाशी संबंधित समस्याही होऊ लागतात.

# आचारसंहितेचे पालन करताना जाणून घ्या – 'काय करावे' आणि 'काय करू नये'

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका २०२४ जाहीर होऊन प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. न्याय्य आणि नि:पक्षपाती वातावरणात निवडणुका पार पडाव्यात यासाठी भारत निवडणूक आयोगाने काही नियम ठरवून दिले आहेत. या नियमांनाच 'आचारसंहिता' म्हटले जाते. निवडणूक घोषित झाल्यापासून सर्वच राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी या आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी दिली आहे.

आचारसंहिता अधिक विस्तृत असल्याने त्यापैकी निवडणूक काळात राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी 'काय करावे' आणि 'काय करू नये' याबाबत काही महत्त्वाची तत्वे सांगितलेली आहेत. जाणून घेऊया याबाबतची माहिती.

काय करावे?

निवडणूक घोषित होण्यापूर्वी सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे सुरू ठेवता येतील. पूर, अवर्षण इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी मदतीचे कार्य सुरू ठेवता येईल. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रकमेची किंवा इतर वैद्यकीय मदत देता येईल. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका ही त्यांची धोरणे, पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशीच संबंधित असावी. स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धक किंवा इतर सुविधांचा वापर करण्याची परवानगी मिळवावी आणि ते वापरण्याच्या नियमांचे पालन करावे. सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या, सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी. मिरवणूक सुरू होण्याची तसेच संपण्याची वेळ व जागा आणि ती जिथून जाणार असेल तो मार्ग अगोदर निश्चित करून पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. सर्व कार्यकर्त्यांनी बिल्ले व ओळखपत्र ठळकपणे लावावेत आणि मतदारांना पुरविण्यात येणाऱ्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असू नये.

काय करू नये?

निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे पालन करताना राजकीय पक्ष तसेच उमेदवारांना सत्ताधारी पक्ष शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात करण्यास प्रतिबंध आहे. उमेदवार आणि मतदानासाठी आलेला मतदार यांच्याशिवाय इतर कोणाही मंत्र्याला मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता येणार नाही. शासकीय काम आणि निवडणूक मोहीम निवडणूक प्रचार यांची सरमिसळ करू नये. इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करू नये. वेगवेगळ्या जाती, समूह आणि धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष, तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये. सर्व धर्मिय प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासाठी करू नये. मतदारांना लाच देणे, दारुचे वाटप करणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण वा धाकदपटशा दाखविणे, तोतयेगिरी, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासांत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यांसारख्या गोष्टींना मनाई आहे. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करू नये. तसेच त्यामुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण करू नये. ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये. इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करू नयेत. याचबरोबर मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाजवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.

आचारसंहितेच्या या तत्त्वांचा भंग झाल्याचे नागरिकांना आढळल्यास त्यांनी सी-व्हिजील ॲपवर ध्वनीमुद्रण, ध्वनीचित्रमुद्रण या माध्यमातून तक्रार करावी, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# रमजान निमीत्त मुस्लीम बांधवास खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्याकडून हार्दीक शुभेच्छा

औसा : इस्लाम धर्मानुसार रमजान हा पवित्र महिना आहे. सदर रमजान महिण्यामध्ये मुस्लीम समाज बांधव महिनाभरात उपवास ठेवून ( रोजे) इस्लाम धर्मानुसार सांगीतलेल्या पाच प्रमुख कामापैकी (इबादद) रोजा ठेवून जकात देतात. दि. ११/०४/२०२४ रोजी रमजान ईद निमीत्ताने औसा शहरातील मुस्लीम समाज बांधव सार्वजनिक नमाज पठनाकरीता ईदगाह मैदान औसा येथे नमाज पठण करणेकरीता उपस्थीत राहतात. सदर कार्यक्रमाप्रसंगी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी उपस्थिती लावून सर्व मुस्लीम समाज बांधवांना रमजान ईद निमीत्त शुभेच्छा दिल्या.

तसेच शहरातील प्रतिष्ठीत व जेष्ठ मुस्लीम बांधवांची भेट घेवून शुभेच्छा दिल्या. यावेळी सहसंपर्कप्रमुख संतोष सोमवंशी,कॉंग्रेस प्रदेश सरचिटणीस अमरजी खानापुरे,राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष जिल्हा युवक अध्यक्ष भरत सूर्यवंशी,महिला आघाडी जिल्हाद्यक्ष जयश्रीताई ऊटगे, शहरप्रमुख सुरेश दादा भुरे,उपजिल्हप्रमुख संतोष सूर्यवंशी, माजी तालुकप्रमुख संजय उजळंबे, माजी नगरसेवक जयराज कसबे, खुणमीर मुल्ला, गणेश गायकवाड, ॲड.मगर,सुरेश मुसडे, मनोज सोमवंशी,सोहेल शेख, शोएब सय्यद,जमीर पठाण, डॉ. वहीद कुरेशी आदीसह औसा शहरातील शेकडो मुस्लीम समाज बांधव उपस्थीत होते.

# त्यांच्या वाणीतून....

संजय मंडलिक काय म्हणाले हे मला माहित नाही. राजघराण्यात दत्तक घेणे हे काही नवीन नाही. तशी अनेक उदाहरणे आहेत. पण दत्तक घेतल्यानंतर ती व्यक्ती त्या घराण्याचा सदस्य, प्रतिनिधी होतो. अशा विधानांवर राजकारण किती खालच्या स्तरावर जात आहे याचे मूर्तीमंत उदाहरण आहे.

– शरद पवार

इंडिया आघाडीने ३० लाख नोकऱ्या निर्माण करण्याचे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आणि एमएसपी लागू करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, यात पंतप्रधान मोदी यांना तुष्टीकरण दिसत आहे. ते जेव्हाही बिहारमध्ये येतात, तेव्हा आमच्या कुटुंबावर भ्रष्टाचाराचा आरोप करतात. जर देशातील जनतेने इंडिया आघाडीच्या हातात सत्ता दिली, तर पंतप्रधान मोदींसह भाजपाचे अनेक नेत्यांना तुरुंगात टाकले जाईल.

– लालू प्रसाद यादव यांची मुलगी मीसा भारती

# (गुरु वचन)
# दु:खावर विजय मिळवा

सिद्धार्थ नावाचा राजकुमार होता. त्याला जीवनात काहीच कमी नव्हते. तो सुंदर, सुदृढ व सद्गृहस्थ होता. त्याला कुठलेही शारीरिक किंवा मानसिक कष्ट नव्हते. त्याच्यापुढे सुख-समृद्धी हात जोडून उभी होती. त्याची पत्नी यशोधरा ही सुंदर, सुदृढ व पतीव्रता होती. त्याचा मुलगा राहुल सुद्धा मनमोहक व सुदृढ होता. सर्व काही होऊनही सिद्धार्थ दु:खाच्या अनुभूतीने पिडीत राहत होता.

खरं म्हणजे जन्मानंतर माणूस कुठल्यातरी शारीरिक किंवा मानसिक दु:खाने पिडीत असतो. दु:खांना पाहून व अनुभवूनच सिद्धार्थ बुद्धात रूपांतरित झाले. अभावावाचे कारण आपण अभावासच दु:खाचे कारण मानतो. जगातील बहुतेक श्रीमंत लोक दु:खी व असमाधानी आहेत. एखादी वस्तु किंवा व्यक्तीचा अभावच त्यांना दु:खी करतो. काही लोकांकडे पैशांची कमी नाही पण ते शारीरिक दु:खाने पिडीत आहेत.

काही लोक काम, क्रोध, ईर्ष्या, द्वेष, मोह सारख्या मानसिक दु:खांनी ग्रस्त असतात. तसेच काही लोक अज्ञानामुळे दु:खी आहेत. जर काही लोकांना दु:ख नसेल तर त्यांच्यासाठी जन्म-मृत्यूचे दु:खच काय कमी आहे? विजय म्हणजे लक्ष्य.जगात सुखाचे काही क्षण असतात. याचे प्रमाण आपणास लोकांचे हसणे, बोलणे, गाणे, खेळण्यात व आनंद साजरा करण्यात मिळू शकते. काही लोक थट्टा-मस्करी करताना दिसतात पण हे सर्व सुख क्षणभंगुर व तात्पुरते आहे. हा सर्व खटाटोप दु:खातून वाट काढण्याचा उपक्रम आहे. जर दु:खास जीवनाचा एक भाग मानले तर आपण याचाच विचार करून आपण आपले बहुमूल्य जीवन नष्ट केले पाहिजे? नाही, आपले लक्ष्य दु:खांवर विजय मिळवणे आहे. हाच आमचा पुरुषार्थ आहे. जगास दु:खालय मानून तडफडत मरणे मानवाचा लज्जास्पद पराभव आहे. त्याने जगास परीक्षा-स्थळ मानत दु:ख-सागरास ओलांडण्याचा उपाय शोधला पाहिजे. यामुळे त्यास सुख व शांतता लाभेल. जिथे रोग आहेत, तिथे उपचार आहे, जिथे अडचणी आहेत, तिथे त्यातून निघण्याचा मार्ग उपलब्ध आहे. फक्त आपल्या हृदयात खरी जिज्ञासा असण्याची गरज आहे. तसेच आपल्या लक्ष्याप्रती निष्ठावान व साहसी बनावे. विचारवंत मानतात की, मानवाची विषय तृष्णाच सर्व दु:खांचे मूळ आहे. जर ते तृष्णाच्या मृग-मरीचिकात फसण्यात स्वत:ला वाचवू शकले तर निश्चितपणे त्यांना कुठलेच दु:ख असणार नाही.

आपणास समोर जे दिसते, मनात तेच मिळण्याची इच्छा असते. जे आपल्याकडे आहे, त्यापेक्षा जास्त मिळवण्याची इच्छा करणेच तृष्णा आहे, जी कधीच पुर्ण होत नाही. जे आपल्याकडे आहे, त्यात समाधान मानून जर जास्तीत जास्त मिळवण्याची अनावश्यक इच्छा सोडली तर सर्व दु:ख टाळले जाऊ शकतात.

जगातील सर्व वस्त नश्वर आहेत. जर व्यक्तीने ही गोष्ट मनात आत्मसात केली तर जगातील कुठलेच दु:ख त्यास विचलित करु शकत नाही. भगवान बुद्धांनुसार, दु:ख निवृत्तीतून निर्वाणीत आहे. स्वत:ला राग-द्वेषातून मुक्त करणेच निर्वाण आहे, ज्यास थोड्या प्रयत्नातून मनुष्य आपल्या जीवनातच मिळू शकते.

# उपदेशकथा
# तन्मयता

परलोकवासी प्रसिद्ध चित्रकार आबालाल रहमान यांची ही गोष्ट. रंगांच्या दुनियेत दंग झालेला हा कलावंत बाजारात गेला नि घेऊन आला दोन रसरशीत कृष्णाकाठची वांगी, तजेलदार भोपळी मिरच्या, शताक्ष सीताफळ नि हिरवीगार कोथिंबीर जुडी. त्यावेळी गोविंदराव टेंब्यांनी विचारलं, 'काय, बाजार आटोपला वाटतं?' चित्रकार उत्तरले, 'अहो, ही भाजी नव्हे चित्रं आहेत. ही वांगी बेटी फार त्रास देणार बघा. वा, वा काय पण रंग आहे.' टेंबे म्हणाले, 'वांगी खाल्ली तरीही त्रास देतातच !' आबालाल यावर उत्तरले, 'अरे, खुदानं वांगी निर्माण केली ती मुळी चित्र बहारीनं रंगवता यावं म्हणून ! खाण्यासाठी नव्हे.' इतके ते सृष्टीतील रंगवृष्टीशी तन्मय झालेले अवलिया चित्रकार होते.

कथा उपदेश : प्रतिभावंत चित्रकार मायकेल एंजेलोने म्हटले आहे की, ज्याला चित्रकार व्हायचं त्याला अवतीभवती सर्वत्र चित्रं दिसली पाहिजेत. जमिनीवर, झाडाझुडपांवर, आभाळात सगळीकडे निसर्गाची तुलिका अजब रेखाटनं करीत असते.

# ही लढाई आहे संविधान वाचविण्याची काँग्रेस महाविकास आघाडीच्या पदाधिकारी बुथ कार्यकर्ता मेळाव्यास उस्फुर्त प्रतिसाद



उदगीर :लोकसभेची निवडणुक ही केवळ निवडणुक नसून ही संविधान वाचविण्याची व्यापक लढाई आहे.त्यामुळे नागरिकांनी काँग्रेस महाविकास आघाडीच्या पाठीशी आपली शक्ती उभी करुन संविधान वाचविण्याच्या लढाईत सहभागी व्हावे, असे आवाहन उदगीर येथील विशाल फंक्शन हॉलमध्ये शुक्रवारी झालेल्या काँग्रेस महाविकास आघाडीच्या बुथ कार्यकर्ता मेळाव्यात करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर, जिल्हा काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याण पाटील, उषा कांबळे, महीला जिल्हा काँग्रेस अध्यक्ष शिला पाटील, व्हा. चेअरमन रविंद्र काळे, मधुकर एकुरगेकर, मारूती पांडे, मन्मथअप्पा किडे, संतोष तिडके, प्रिती भोसले, सरोजनी बिराजदार, चारूशीला पाटील, शिवाजीराव हुडे, शिवाजीराव मुळे, अजीम दायमी, सोपान ढगे, प्रभाकर काळे, संतोष पाटील, रामकिशन सोनकांबळे, संजय पवार, बालाजी गुरुडे, गोविंद भालेराव, चंदन पाटील नागराळकर, मंजुरखां पठाण, महेबुब शेख, गोविंद भालेराव, प्रकाश खटके,शिवाजी देवनाळे, मोहन पाटील, विवेक जाधव, चदकांत टेगाटोले, राजकुमार भालेराव, बालाजी पाटील नेत्रगांवकर, महेश धुळशेटटे, श्रीमंत सोनाळे, पद्माकर उगिले, अभिजीत दायमा, कैलास पाटील, मंजुखॉ पठाण, रामेश्र्वर बिराजदार, गजानन सताळकर, चंदकांत खटके, धनराज दळवे, श्रीकांत पाटील, ड. बनसोडे, नाना ढगे, ज्ञानोबा गोडभरले, संतोष बिरादार, कुमार पाटील, अशिष राजूरकर, पदमाकर उगीले, नामदेव बिरादार, विनोद पाटील, अनिल पंचाकक्षरी यांच्यासह काँग्रेस महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# राशीभविष्य १३ एप्रिल २०२४

मेष : शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर

सामाजिक कामात यश व सन्मान मिळण्याचे योग आहे. परिश्रमाचा पूर्ण मोबदला मिळेल. उत्पन्नात वाढ होईल. खाण्या:पिण्यावर लक्ष असू द्या. रोजगारात प्रगती राहील.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व

पूर्वी केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसेल. मुलांच्या बाबतीत भावनीक समस्या निर्माण होतील. व्यापारात नवीन योजना आखाल त्या फायदेशीर असतील.

मिथुन : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण

मित्रांचे सहकार्य लाभेल. विचारपूर्वक काम केल्याने कामात यश मिळणार आहे. साथीदारांच्या कामावर लक्ष असू द्या. शिक्षणा संबंधीतील कामात यश मिळेल.

कर्क : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर

कौटुंबिक सदस्याचे आपल्या विषयी मत चांगले राहील. काम करतांना वेळेचे बंधन राखा. आर्थिक गुंतवणूक विचारपूर्वक करा. रागावर नियंत्रण राखणे गरजेच आहे.

सिंह : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:उत्तर

कामात यश मिळाल्याने आनंदी रहाल. प्रवास फायदेशीर असणार आहे. नातेवाईकांशी असलेल्या संबंधावर मर्यादा राखा. कायदेशीर बाबी पूर्ण करा.

कन्या : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर

मागील स्मृती उजाळल्यामुळे दु:ख होईळ. धार्मिक प्रवृत्तीत वाढ होईल. उच्च अधिकाऱ्यांच्या भेटी होती. काम चुकारपणा करू नका.

तुळ : शुभ रंग :पिवळा, शुभ दिशा: दक्षिण

कामकाजात आलेली समस्या आपल्या प्रयत्नामुळे दूर होईल. बाहेरील व्यत्तिंफ्च्या कामकाजावर विशेष लक्ष द्या. यश मिळाल्याने उत्साह वाढेल. व्यापार व्यवसाय फायदेशीर राहील. महत्वकांक्षा पूर्ण होतील.

वृश्चिक : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:दक्षिण

मनमानीने काम करण्याची प्रवृत्तीमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती खराब राहील. कुटुंबातील सदस्यांच्या प्रकृतीची काळजी घ्या.

धनु : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पूर्व

विशेष काम होण्याचे योग आहेत. साथीदाराचे सहकार्यामुळे मन प्रसन्न राहील. वहान चालवताना सावधानी बाळगा. शारिरीक कामात वाढ करण्याकरिता प्रयत्न करा.

मकर : शुभ रंग: लाल : शुभ दिशा: पूर्व

जुन्या परिचित व्यक्तिची अचानक भेट होईल. मनोबलात वाढ होईल. आर्थिक स्थिती चांगली राहील. कामकाजाची परिस्थिती चांगली राहील. घरासंबंधातील समस्या निर्माण होऊ शकते.

कुंभ : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व

शुभकामाची रूपरेषा आखाल. राजकीय कामात यश मिळण्याचे योग आहेत. जास्त फायदा मिळण्याच्या दृष्टीने केलेले प्रयत्न फायदेशीर राहतील. दुसऱ्याच्या बोलण्यावर विश्वास दाखवू नका.

मीन : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व

जोशपूर्वक कामात रस घ्याल. हुशार व्यक्तिची भेट होईल त्यामुळे फायदा होईल. कौटुंबिक समाधान लाभल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या वस्तू संभाळा.

१३ एप्रिलला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, गुरू, हर्षल व मंगळाचा प्रभाव आहे. वैचारिक प्रांतात तुम्ही आघाडीवर असता. आपल्या क्रांतिकारक विचारसरणीने लोकांना धक्के द्यायला तुम्हाला आवडते. तुमच्याकडे उत्साहाचा प्रंचड साठा असतो. जुन्या नीतिमूल्यांबाबत तुम्हाला आदर असला तरी परंपरेच्या चौकटीत आपल्या व्यक्तिमत्वाला कोंडमारा होतो असे तुम्हास वाटते. व्यक्तिस्वातंत्र्याला तुम्ही खूपच महत्व देता. स्त्रीमुक्ती, दलितांच्या उध्दारासाठी सामाजिक कार्य करण्यात, त्यासाठी वेळप्रसंगी सामाजिक आंदोलन उभारण्यात तुम्ही अग्रेसर असता.

तुमच्या लहरीपणामुळे तुमची विश्वासाहर्ता कमी होईल. नवे विचार पटण्यासाठी लोकांची मनोभूमिका बदलण्याचा प्रयत्न करा. क्षय, अपस्मार, भ्रमिष्ठपणा असे विकार तुम्हाला होऊ शकतात.

# इतिहासात आजचा दिवस १३ एप्रिल

अंतरराष्ट्रीय

१०५५ – व्हिक्टर दुसरा पोपपदी.

११११ – हेन्री पाचवा, पवित्र रोमन स्म्राटपदी.

१२०४ – चौथ्या क्रुसेडने कॉन्स्टेन्टिनोपल लुटले.

१२५० – सातव्या क्रुसेडचा इजिप्तमध्ये पराभव. फ्रांसचा राजा लुई नव्वा युद्धबंदी.

१८२९ – ब्रिटीश संसदेने रोमन कॅथोलिक व्यक्तिंना धर्मस्वातंत्र्य दिले.

१८४९ – हंगेरी प्रजासत्ताक झाले.

१८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – दक्षिणेच्या सैन्याने फोर्ट सम्टरचा पाडाव केला.

१९४१ – जपान व सोवियेत संघाने तटस्थतेचा तह केला.

१९४५ – जर्मनीच्या गार्डेलजेन शहरात १,०००हून अधिक राजबंदी व युद्धबंद्यांची हत्या.

१९७० – अपोलो १३मधील ऑक्सिजन टॅंकचा स्फोट. आतील अंतराळवीर यानासह भरकटण्याची भीती.

१९७४ – व्यापारी तत्त्वावर चालणारा पहिला भूस्थिर उपग्रह वेस्टार १ प्रक्षेपित.

२००२ – व्हेनेझुएलात ह्युगो चावेझ विरुद्धचा उठाव फसला.

२००७ – पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांनी देशातील सरन्यायाधीशांना बडतर्फ केल्यानंतर विरोध प्रदर्शन करण्यापूर्वीच पोलिसांनी विरोधी पक्षाच्या २०० जणांना अटक केली.

राष्ट्रीय : १९१९ – जालियानवाला बागची कत्तल – भारताच्या अमृतसर शहरातील जालियानवाला बाग येथे भरलेल्या नि-शस्त्र नागरिकांच्या सभेवर ब्रिटीश सैन्याने गोळीबार केला. ३७९ ठार. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रमातील ही एक महत्त्वाची घटना होती.

१९३९ – भारतात हिंदुस्तानी लाल सेनेची स्थापना.

२००८ – मॅरेथॉनमध्ये धावण्याचा विक्रम करणाऱ्या 'वंडर बॉय' बुधिया सिंगचे वादग्रस्त प्रशिक्षक बिरांची दास यांची भुवनेश्वर येथे अज्ञात इसमांनी गोळ्या झाडून हत्या केली.

जन्म

१७१३ – लॉर्ड फ्रेडरिक नॉर्थ, इंग्लंडचा पंतप्रधान यांचा जन्म.

१७४३ – थॉमस जेफरसन, अमेरिकेचा तिसरा राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

१८६६ – बुच कॅसिडी, अमेरिकन लुटारूचा जन्म.

१८९४ – आर्थर फॅडेन, ऑस्ट्रेलियाचा तेरावा पंतप्रधान यांचा जन्म.

१९२२ – ज्युलियस न्यरेरे, टांझानियाचा पंतप्रधान यांचा जन्म.

१९६३ – गॅरी कास्पारोव्ह, रशियाचा बुद्धिबळपटूचा जन्म.

निधन

१६०५ – बोरिस गोडुनोव्ह, रशियाचा झारांचे निधन.

१८६८ – ट्युवोड्रोस, इथियोपियाचा स्म्राटांचे निधन.

१९६६ – अब्दुल सलाम आरिफ, इराकचा राष्ट्राध्यक्षांचे निधन.

# समाजसुधारक महात्मा फुले यांना जयंतीनिमित्तआ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून विनम्र अभिवादन



लातूर -ज्येष्ठ विचारवंत, समाज सुधारक, सामाजिक प्रबोधनकार, लेखक अस्पृश्यता व जाती व्यवस्थेचे निर्मूलन आणि स्त्रियांना व मागास जातीच्या लोकांना शिक्षक देण्याचे कार्य करणारे महात्मा ज्योतिराव फुले तथा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी विनम्र अभिवादन केले.

बाल विवाहाच्या विरोधातील आणि विधवा पुनर्विवाहाचे समर्थक महात्मा फुले यांनी समाज, धर्म आणि परंपरा याचे सत्य समोर आणण्यासाठी अनेक पुस्तकाचे लिखान केले. या थोर विचारवंताच्या जयंती दिनानिमित्ताने भाजपच्या संवाद कार्यालयात भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी लातूर तालुका संगायो समितीचे अध्यक्ष वैभव सापसोड, प्रताप पाटील, अशोक सावंत, पाडूरंग बालवाड, लक्ष्मण नागिमे, लक्ष्मण खलंग्रे यांच्यासह अनेक जण होते.

